महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
त्रिशूल गोल्ड फिल्ड, प्लॉट नंबर ३४, सरोवर विहार समोर, सेक्टर ११, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४००६१४ ०२२-६९१२३९००
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in
@mpsc_office @official_mpsc

क्रमांक : ३७४(२)/वि.यां/२०२२/१९ दिनांक : २४ जुलै, २०२३.

## -: प्रसिद्धीपत्रक :-

विषय :- **महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा-२०२२**
गुणपत्रक, स्कॅन उत्तरपत्रिका व गुणांच्या फेरपडताळणीबाबत (Retotaling)

**संदर्भ :-** अधिसूचना क्रमांक ०१४/२०२३, दिनांक ०२ मार्च, २०२३

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक १३ मे, २०२३ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र विद्युत व यांत्रिकी अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा- २०२२ चा निकाल दिनांक २० जुलै, २०२३ रोजी जाहीर करण्यात आला आहे.

२. सदर परीक्षेस अर्हताप्राप्त न ठरलेल्या उमेदवारांना त्यांचे गुण व स्कॅन उत्तरपत्रिका उमेदवारांच्या खात्यामधील संबंधित परीक्षेच्या नावासमोरील 'View' अंतर्गत उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच गुणांची फेरपडताळणी (Retotalling) करु इच्छिणाऱ्या उमेदवारांना फेरपडताळणीकरीता अर्ज सादर करण्यासाठी वेबलिंक उपलब्ध करुन देण्यात येत आहे. सदर वेबलिंकद्वारे विहित शुल्कासह अर्ज सादर करण्याकरीता पुढील प्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

(१) आयोगाच्या https://mpsc.gov.in या संकेतस्थळावरील "ONLINE FACILITIES" मधील Retotaling of Marks या लिंकवर क्लिक करावे.

(२) उपलब्ध होणाऱ्या परीक्षांच्या यादीमधून संबंधित परीक्षेची निवड करावी.

(३) परीक्षेच्या अर्जात नमूद मोबाईल क्रमांक नमूद करून सदर क्रमांकावर प्राप्त होणारा ओटीपी प्रविष्ट करून लॉगीन करावे.

(४) Retotalling संदर्भातील लिंकवर क्लिक करावे.

(५) उपलब्ध होणाऱ्या गुणपत्रातील गुणांची फेरपडताळणी करावयाची असलेल्या एक किंवा जास्त विषयाची निवड करून Save बटनवर क्लिक करावे.

(६) निवड केलेल्या विषयानुसार सेवा शुल्कासह विहित शुल्क ऑनलाईन पद्धतीने अदा करावे.

३. गुणांच्या फेरपडताळणीकरीताची सदर वेबलिंक दिनांक २५ जुलै, २०२३ ते दिनांक ३ ऑगस्ट, २०२३, २३:५९ या कालावधीत उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

४. उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार गुणांच्या फेरपडताळणीकरीता अर्ज करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा ७३०३८२१८२२ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधता येईल.

ठिकाण : नवी मुंबई

उपसचिव (परीक्षोत्तर राजपत्रित )
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.